# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था).

विद्यानगर, कोल्हापूर ४१६००४

दुरध्वनी : (०२३१) २५२१०३८ (कार्या.), २५२१०१६ (वै.फॅक्स), E-Mail – gpkolhapur@yahoo.com

---

जा.क्र.शातंनिको/विवि/परीक्षा फी परतावा/753 दिनांक:- 18 FEB 2020

## फक्त विद्यार्थ्यांकरीता सुचना

या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१९-२० या प्रवेश प्रथम, व्दितीय व तृतीय वर्षांकरीता प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, माहे ऑक्टोबर २०१९ ते नोव्हेंबर २०१९ या कालावधीत क्यार व महा चक्रीवादळामुळे झालेल्या अवेळी पावसामुळे शेतीपिकांच्या नुकसान झालेल्या शेतक-यांचे पाल्यांना परीक्षा फी माफ करणेकरीता या संस्थेतील फक्त खुल्या व एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खालील अटी व शर्ती अधीन राहून परीक्षा शुल्काचा परतावा देय राहील. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी दि.२५/०२/२०२० पर्यंत अर्ज विद्यार्थी विभागात जमा करावेत. अर्ज सादर करण्यास विलंब झाल्यास स्वत: विद्यार्थी जबाबदार राहील, याची नोंद घ्यावी.

१) सदरील विद्यार्थ्यांचा वडील/पालक हा शेतकरी असला पाहिजे.

२) सदरील विद्यार्थ्यांनी शेती / पिकांचे नुकसान झालेला पंचनामा तलाठी /ग्रामसेवक /कृषीसेवक यांचेकडील पंचनामा सादर करावा.

३) सदरील परीक्षा फी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृती योजनेसाठी ऑनलाईन अर्ज केला असल्यास परीक्षा शुल्कांत ५० टक्के सवलत शासनांकडून मिळते व उर्वरीत ५० टक्के परतावा संस्थेकडून देय राहील.

४) परीक्षा शुल्क परताव्याचे लाभ घेण्याकरीता विद्यार्थी हा संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१९ मध्ये प्रवेशित असावा. त्याकरीता बोनाफाईड प्रमाणपत्र आवश्यक राहील.

५) इतर प्रवर्गातील ( ओ.बी. सी., एन. टी /व्ही. जे., एस. सी.,एस.टी, एस.बी.सी.) विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर स्कॉलरशीप / फ्रीशीप या सवलतीकरीता अर्ज केल्यामुळे त्यांना १०० टक्के परीक्षा शुल्क मिळणार असल्याने सदरील विद्यार्थ्यांनी फी परतावा अर्ज करु नये.

६) नियमित विद्यार्थ्यांना परतावा अनुज्ञेय राहील.

**खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावेत.** (True copy)

१) परीक्षा शुल्क माफीचा परतावा मिळणेबाबतचा अर्ज

२) पंचनामा

३) बोनाफाईड प्रमाणपत्र

४) दोन्ही सत्रांच्या परीक्षा शुल्क भरलेली पावतीची छायांकित प्रत

५) उत्पनाचा दाखला

६) बॅक पासबुक छायांकित प्रत ( फक्त विद्यार्थ्यांची )

७) आधार कार्ड

८) बॅक खाते व आधार कार्डला लिंक असला पाहिजे.

प्राचार्य

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

प्रत:- १) सर्व विभागांना सुचना फलकांवर लावणेकरीता.

१) यंत्र अभियांत्रिकी २) विद्युत अभियांत्रिकी ३) अणुविद्युत अभियांत्रिकी ४) औद्योगिक अणुविद्युत ५) मांहिती तंत्रज्ञान ६) धातुशास्त्र ७) शर्करातंत्र ८) स्थापत्य अभियांत्रिकी ९) विद्यार्थी विभाग

२) श्री. इंगळे, प्रोग्रमर यांना संकेत स्थळावर प्रदर्शित करणेसाठी. ( परिक्षा विभाग )